# मेट्रो ३ स्थानकांचा पृष्ठभाग पुन्हा होणार हिरवागार

## ३००० झाडांचे मूळ जागी वृक्षारोपण मोहिमेला सुरूवात

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो ३ मार्गाच्या स्थानकाची कामे पूर्ण झाल्यानंतर स्थानकांचा पृष्ठभाग पूर्ववत आणि हरित करून देण्याचे आश्वासन मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने दिले होते.त्यानुसार आता या स्थानकांच्या कामामुळे बाधित झालेल्या तीन हजार झाडांच्या मोबदल्यात तेवढीच झाडे लावण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकिय संचालक अश्विनी भिडे यांच्या हस्ते सिप्झ मेट्रो स्थानकांतील इलेक्ट्रॉनिक्स प्रादेशिक चाचणी प्रयोगशाळा परिसरात या मोहिमेचा प्रारंभ झाला. मेट्रो-३ मधील २६ स्थानकांच्या बांधकामादरम्यान साधारण ३००० झाडे प्रभावित झाली होती. ही झाडे पुन्हा लावण्यात येतील असे प्रतिज्ञापत्र मेट्रो ३ ने न्यायालयात सादर केले होते. त्यादृष्टीने विविध नर्सरीमध्ये १८ इंच परिघापर्यंत झाडे रुजवली जात होती.१८ इंच परीघ असलेली झाडे पुन्हा संबंधित स्थानकांच्या पुष्टभागावर लावली जात आहेत.

वृक्षारोपणाला मेट्रोच्या पॅकेज १९ पासून करण्यात आली असून याअंतर्गत सिप्झ ते धारावीपर्यंतच्या १० स्थानकांचा समावेश आहे. पॅकेज १९ अंतर्गत देशी बदाम, ताम्हण (फुल) आणि पांगारा (फुल) प्रजातींसह १७ स्थानिक प्रजातींची एकूण १०८५ झाडे लावली जातील.

'मूळ जागी वृक्षरोपण मोहिमेला सुरूवात करून आपण पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलत असल्याचा आनंद होत आहे. या मोहिमे अंतर्गत पुढील ३ वर्षांमध्ये बागेत रुजवलेली जवळपास ३००० हजार झाडे मेट्रो स्थानकांच्या परिसरात लावून त्यांची तीन वर्ष देखरेख कॉर्पोरेशन द्वारे केली जाणार आहे', असे भिडे यांनी सांगितले.